# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह

# कॉटन ग्रोअर्स

# मार्केटिंग फेडरेशन लि.

मुंबई- १५.

# पहिला

## वार्षिक अहवाल

सन १९८४-८५

तारेचा पत्ता "मास्कोफेड"

टे.नं. ४१३७९५३
४१३३१३५

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि.

गौतम बिल्डींग, झकेरिया बंदर रोड, शिवडी, मुंबई नं. ४०० ०१५.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई ची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. १३.५.८६ रोजी सकाळी ११ वाजता कमल नयन बजाज हॉल, तळ मजला, जमनालाल बजाज रोड, २२४, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१ येथे पुढील कामासाठी आयोजित करण्यात आली आहे.

१. संचालक मंडळाने शिफारस केलेला १९८४-८५ चा वार्षिक अहवाल, नफातोटा पत्रक, दि. ३०.९.८५ अखेर चा ताळेबंद व नफा वाटणी मंजूर करणे.

२. फेडरेशनच्या पोट नियमांमध्ये दुरुस्ती करण्याबाबत संचालक मंडळाच्या सोबत दिलेल्या शिफारशींचा विचार करुन त्या दुरुस्तीसह पोटनियम स्वीकारणे.

३. मा. अध्यक्ष यांचे मंजूरीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

तरी सभासद संस्थांच्या प्रतिनिधींनी सभेला अवश्य हजर रहावे ही विनंती.

**बा. क. अग्रवाल**
कार्यकारी संचालक
संचालक मंडळाच्या हुकूमावरून

ता. २४–४–८६.

---

टीप:

१) फेडरेशनच्या पोटनियम ९ नुसार असणाऱ्या सभासद संस्थेला संचालक मंडळाचा अथवा योग्य त्या समितीचा ठराव करुन आपल्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी व मत देण्यासाठी एक प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. अधिकृत प्रतिनिधीचे नांव संचालक मंडळ/ समितीच्या ठरावाची नक्कल दि. ६.५.८६ रोजी अगर तत्पूर्वी फेडरेशनच्या प्रधान कार्यालयास मिळेल अशी पाठविण्याची विनंती आहे.

२) सभासद संस्थांना फेडरेशनच्या कामकाजा विषयी जे काही प्रश्न विचारावयाचे असतील ते प्रधान कार्यालयाकडे दि. ६.५.८६ पर्यंत पाठविण्याची विनंती आहे. ऐनवेळी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देता येणार नाहीत.

३) गणपूर्ती अभावी सभा होऊ न शकल्यास त्याच दिवशी एक तासानंतर सभेचे कामकाज विषय पत्रिकेनुसार सुरु करण्यात येईल व ते अधिकृत राहील.

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि.

## संचालक मंडळ

| अ. नं. | संचालकाचे नाव | विभाग | पद |
|---|---|---|---|
| १) | मा. श्री. छ. आ. केदार | नागपूर | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. शामराव कदम | नांदेड | उपाध्यक्ष |
| ३) | मा. श्री. बबनराव चौधरी, चिखली | खामगांव | संचालक |
| ४) | मा. ना. श्री. वसंतराव धोत्रे, अकोला | अकोला | संचालक |
| ५) | मा. श्री. के. एम्. (बापू) पाटील, | जळगांव | संचालक |
| ६) | मा. ना. श्री राम मेघे | अमरावती | संचालक |
| ७) | मा. श्री. दादासाहेब खैरकार | यवतमाळ | संचालक |
| ८) | मा. श्री. टी. जी. देशमुख, | यवतमाळ | संचालक |
| ९) | मा. श्री. शिवाजीराव पाटील (धुळे) | धुळे | संचालक |
| १०) | मा. श्री. अजितसिंह बाळासाहेब जहागिरदार<br>माळशिरस, सोलापूर | फलटण | संचालक |
| ११) | मा. ॲडव्होकेट श्री. विठ्ठलराव कुंटे | औरंगाबाद | संचालक |
| १२) | मा.ना. श्रीमती रजनी सातव | परभणी | संचालिका |
| १३) | मा. ॲडव्होकेट शं. बा. बोबडे, खामगांव<br>प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. मार्केटिंग फेडरेशन | | संचालक |
| १४) | मा. श्री. शिवाजीराव पाटील, बुलढाणा<br>प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. स्पिनिंग मिल्स फेडरेशन | | संचालक |
| १५) | मा. श्री. रा. ज. देवतळे,<br>प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. जि. व प्रे. सो. फेडरेशन | | संचालक |
| १६) | मा. श्री. बापूसाहेब देशमुख<br>प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सह. बँक मुंबई. | | संचालक |
| १७) | मा. श्री. बाबूराव आडासकर<br>प्रतिनिधी, महाराष्ट्र कृषि ऊ. बा. स. महासंघ | | संचालक |
| १८) | <br>प्रतिनिधी, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, मुंबई. | | संचालक |
| १९) | मा. श्री. बी. के. अगरवाल, व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र राज्य सह. कापूस उत्पादक पणन महासंघ लि. | | संचालक |
| २०) | मा. श्री. रा. ना. चिन्मुळगुंद, उपसचिव-कापूस' ( मार्च ८५ पर्यंत)<br>मा. श्री. प्रभाकर दीक्षित, उपसचिव-**कापूस** ( मे ८५ पासून).<br>कृषि व सहकार विभाग | | संचालक |
| २१) | मा. सहकार आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी | | संचालक |

श्री. ना. शेवडे, सहनिबंधक सह. संस्था (लेखापरिक्षा) कपास.

बँकर्स- दि. महाराष्ट स्टेट को.–ऑप. बँक लि. मुंबई.

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि.

## पहिला वार्षिक अहवाल

**सन्माननीय सहकारी मित्रहो**

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि. या संस्थेच्या दि. ३० सप्टेंबर १९८५ रोजी संपलेल्या सहकार वर्षाच्या कामकाजाचा पहिला वार्षिक अहवाल व ताळेबंद, व्यापारी पत्रक आणि नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्यावतीने आपणांस सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे. विशेष आनंद यासाठी की, गेल्या अनेक वर्षांपासूनची कापूस उत्पादकांची कापसाच्या व्यवहारासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापण्याची मागणी मान्य होऊन दि. ३१.८.८४ रोजी कापसाच्या व्यवहारासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना महाराष्ट्र शासनाने केली. १९७२ च्या कापूस हंगामापासून महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेली एकाधिकार कापूस खरेदी योजना हंगाम १९८३-८४ पर्यंत महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई या संस्थेकडून शासनाचे चिफ एजंट म्हणून राबविण्यात आली. हंगाम १९८४-८५ पासून ही योजना राबविण्यास कापूस पणन महासंघावर शासनाने जी जबाबदारी टाकली आहे ती स्विकारून ही योजना कार्यक्षमतेने राबविण्याचा कापूस पणन महासंघाने आटोकाट प्रयत्न केलेला आहे. तसे करतांना जुन्या संस्थेकडून जिंदगी व येणे आणि देणे हस्तांतरण, सेवकांना त्या संस्थेत समावून घेण्याचे प्रश्न कामकाजात सुधारणा, तसेच कापसाचे प्रक्रियेत येणारी घट कमी करण्याचे प्रयत्न, या सर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करून ही संस्था समर्थपणे वाटचाल करीत आहे. या सर्व प्रयत्नात महाराष्ट्र शासन, भारत सरकार, रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सहकारी संस्था, शेतकरी वर्ग, सहकारी सब एजंट संस्था तसेच गाठी व सरकी विकत घेणारे ग्राहक इत्यादींनी संस्थेस जे बहुमोल सहकार्य दिले त्याबद्दल त्या सर्वांना अंतःकरण पूर्वक धन्यवाद देऊन संस्थेच्या कार्याचा संक्षिप्त अहवाल सादर करीत आहे.

**शासन आस्थापना :-**

हंगाम १९७२-७३ पासून कापूस एकाधिकार खरेदी योजना दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई ही संस्था राबवीत होती. यानंतर महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई या संस्थेची स्थापना दि. ३१.८.८४ रोजी रजिस्ट्रेशन नं. बीओअेम् / अेजीआर / (अेम्) / १(अेम्) / ८४-८५ अन्वये झाली. महाराष्ट्र शासनाच्या कृषि व सहकार विभागाने जा. क्र. केपीएस् / १०८४ / ४१६१५ / १०-सी दि. ८.९.८४ च्या पत्रान्वये महासंघाची महाराष्ट्र रॉ कॉटन (प्रोक्युरमेंट, प्रोसेसिंग ॲण्ड मार्केटिंग) ॲक्ट १९७१ नुसार एकाधिकार कापूस खरेदी योजनेचे चिफ् एजंट म्हणून नियुक्ती केली व शासन निर्णय क्र. कापूस १०८४-४१८१३-१० सी दि. ९.१०.८४ अन्वये अध्यक्ष; उपाध्यक्षांसह पहिल्या संचालक मंडळाचे (एकूण २१ संचालक) नामनिर्देशन करण्यात आले.

**सभासद व भागभांडवल**

कॉटन ग्रोअर्स फेडरेशनची अहवाल वर्षामधील सभासद संख्या व भागभांडवल खालील प्रमाणे आहे.

| सभासद | सभासद संख्या ३०.९.८५ अखेर |
|---|---|
| सभासद | १०३ |
| महाराष्ट्र शासन | १ |
| नाममात्र (नॉमिनल) सभासद | २३० |
| **भागभांडवल** | **दि. ३०.९.८५ अखेर** |
| सभासद | रु. २४,८००/- |
| महाराष्ट्र शासन | रु. १५,००,०००/- |

**संचालक मंडळ व समित्या**

पोटनियम क्र. ५० मधील तरतुदीनुसार कार्यकारी समिती, सेवक समिती, खरेदी विक्री धोरण समिती व पोटनियम क्र. ५७ अन्वये विभागीय सल्लागार समिती (प्रत्येक विभागासाठी एक) या समित्यांची नियुक्ती करण्यात आली.

संचालक मंडळाच्या आणि उपसमित्यांच्या अहवाल सालात झालेल्या सभांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| | एकूण सभा |
|---|---|
| संचालक मंडळ | ११ |
| **समितीचे नांव** | |
| १) कार्यकारी समिती | ९ |
| २) सेवक समिती | १० |
| ३) खरेदी विक्री धोरण समिती | १० |

या व्यतिरिक्त सब एजंट कमिशन, योजनेच्या कामकाजात सुधारणा सुचविण्याकरिता योजनासुधार समिती, सेवकांकरिता ग्रॅच्युईटी ट्रस्ट, प्रा. फंड ट्रस्ट, सेवा नियम बनविण्यासाठी सेवा नियम समिती अशा उपसमित्यांची वेळोवेळी प्रसंगानुरुप नियुक्ती करण्यात आली. या उपसमित्यांच्या अहवालाची संबंधित समित्यांमध्ये माहिती घेण्यात येऊन त्याबाबत निर्णय घेण्यात आले आहेत.

**आस्थापना विभाग**

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. मुबई या संस्थेत कापूस विभागात जे कर्मचारी काम करीत होते व ज्यांनी त्यांच्या सेवा ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशनमध्ये समाविष्ट करुन घेण्यास संमती दिली होती, त्यांना नवीन संस्थेत समाविष्ट करुन घेण्यांत आले आहे. अशा तऱ्हेने विविध पदांवरील नियमित वेतन श्रेणीतील एकूण २०७७ अधिकारी व सेवकांना या संस्थेत सामावून घेणेत आले आहे. श्रेणी निहाय अधिकारी व सेवकांची संख्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | उच्चश्रेणी | २४ |
| २) | प्रथमश्रेणी | ३४४ |
| ३) | द्वितीयश्रेणी | ४२९ |
| ४) | तृतीयश्रेणी | ९८४ |
| ५) | चतुर्थश्रेणी | २९६ |
| | एकूण | २०७७ |

सध्या फेडरेशनच्या अधिपत्याखाली ११ विभागीय व ७५ उप विभागीय कार्यालये असून या शिवाय अहमदाबाद, कोईमतूर व बंगलोर या ठिकाणी विक्री कार्यालये अस्तित्वात आहेत. या व्यतिरिक्त कलकत्ता येथे स्वतंत्र एजंट नेमून त्यांचेकडे गांठी विक्रीचे काम सोपविण्यात आलेले आहे.

कायदा विभाग

१) **फेडरेशनने दाखल केलेले लवाद दावे : –**

वर्षारंभी विविध संस्था व व्यक्ती विरुध्द फेडरेशनने दाखल केलेले सात लवाद दावे निरनिराळ्या कोर्टात चालू होते. त्यात गुंतलेली रक्कम रु.१,६४,२८६.८२ इतकी होती.

चालू वर्षात एकही लवाद दावा फेडरेशनने दाखल केलेला नाही.

अहवाल सालात दोन लवाद दाव्यांचा निकाल लागून दोन्ही मध्येही फेडरेशनच्या बाजुने निकाल झालेला आहे. त्यात गुंतलेली रक्कम रु. ५४,५१२.१२ इतकी आहे.

अशा रितीने दोन निकाली दावे वजा जाता फेडरेशनने दाखल केलेल्या पांच लवाद दाव्यांची सुनावणी चालू आहे. त्यात गुंतलेली रक्कम रु.१,०९,७७४.७० इतकी आहे.

२) **फेडरेशन विरुध्द दाखल झालेले लवाद दावे : –**

वर्षारंभी फेडरेशनच्या विरुध्द निरनिराळ्या कोर्टात १७ लवाद दावे चालू होते. त्यात मागणी केलेली रक्कम रु. ३,८५,७४७.७० इतकी होती.

अहवाल सालात फेडरेशन विरुध्द दोन लवाद दावे नव्याने दाखल झाले. त्यात मागणी केलेली रक्कम रु. ६,०२५.०० इतकी आहे.

अहवाल सालात एक दाव्याचा निकाल झालेला असून तो फेडरेशनच्या विरोधात गेलेला आहे. त्यात गुंतलेली रक्कम रु. ३०,१२२.७९ इतकी आहे.

अशी रितीने फेडरेशन विरुध्द दाखल झालेल्या दाव्यापैकी एक निकाली दावा वजा जाता १८ दाव्याची सुनावणी चालू आहे. त्यात गुंतलेली रक्कम रुपये रु. ३,६१,६४९.९१ इतकी आहे.

३) **फेडरेशनने दाखल केलेले दिवाणी दावे : –**

वर्षारंभी फेडरेशनने निरनिराळ्या व्यक्ति व संस्था विरुध्द दाखल केलेले १९ दावे विविध कोर्टात चालू होते. त्यात गुंतलेली रक्कम रु.६३,५०,७३७.६४ इतकी होती.

अहवाल सालात फेडरेशनने एक दिवाणी दावा दाखल केलेला आहे. त्यात गुंतलेली रक्कम रु.७५,०५५.७३ इतकी आहे.

अहवाल सालात फेडरेशनने दाखल केलेल्या व निकाली झालेल्या दिवाणी दाव्यांपैकी एकाही दिवाणी दाव्याचा निकाल फेडरेशनच्या बाजूने लागलेला नाही व एका दिवाणी दाव्याचा निकाल फेडरेशनच्या विरुध्द लागलेला आहे. त्यात गुंतलेली रक्कम रु. २,३१०.०० इतकी आहे.

अशा तऱ्हेने वर्षाअखेरीस १ निकाली दिवाणी दावा वजा जाता १९ दिवाणी दावे विविध कोर्टात चालू असून त्यात गुंतलेली रक्कम रु. ६४,२३,४८३.३७ इतकी आहे.

४) **फेडरेशन विरुद्ध चालू असलेले दिवाणी दावे : –**

वर्षारंभी विविध संस्था व व्यक्तींनी फेडरेशनच्या विरुध्द दाखल केलेले ८३ दिवाणी दावे विविध कोर्टात चालू होते. त्यात गुंतलेली रक्कम रु. २६,०९,६०३.५९ इतकी होती.

अहवाल सालात फेडरेशन विरुध्द १० दिवाणी दावे दाखल झालेले आहेत. त्यात मागणी केलेली रक्कम रु. १,८९,०६३.८१ इतकी आहे.

अशाप्रकारे अहवाल सालात फेडरेशन विरुध्द दाखल झालेल्या एकूण दिवाणी दाव्यांपैकी ५ दिवाणी दावे निकाली झाले असून त्यात २ दिवाणी दाव्यांचा निकाल फेडरेशनच्या बाजूने लागला आहे व त्यात मागणी केलेली रक्कम रु. ४२,६२५.०० इतकी आहे.

तीन दिवाणी दावे फेडरेशनच्या विरुध्द गेले असून त्यात मागणी केलेली रक्कम रु. १०,१६५.१२ इतकी आहे.

अशारितीने वर्षाअखेरीस फेडरेशन विरुध्द दाखल झालेल्या दिवाणी दाव्यांपैकी ५ निकाली दिवाणी दावे वजा जाता ८८ दिवाणी दाव्यांची सुनावणी विविध कोर्टात चालू आहे. त्यात मागणी केलेली रक्कम रु. २७,४५,८७७.२८ इतकी आहे.

५) **कच्चा कापूस कायद्याखाली फेडरेशनने दाखल केलेले अर्ज : –**

वर्षारंभी फेडरेशनने असे ५ अर्ज दाखल केलेले होते. त्यात मागणी केलेली रक्कम रु. ८८,०५,६७८.८३ इतकी होती.

अहवाल सालात नव्याने एकही अर्ज दाखल करण्यात आलेला नाही व एकही निकाल अहवाल सालात झालेला नाही. सदरचे ५ ही अर्ज अनिर्णीत आहेत.

६) **कच्चा कापूस कायद्याखाली फेडरेशनविरुद्ध दाखल झालेले अर्ज : –**

वर्षारंभी फेडरेशन विरुध्द दाखल झालेला एक अर्ज असून त्यांत गुंतलेली रक्कम रु. १,९९,८३७.७८ इतकी आहे. सदरचा अर्ज अद्याप अनिर्णित आहे.

७) **फेडरेशनने दाखल केलेले रिट अर्ज व फेडरेशनविरुद्ध दाखल केलेले रिट अर्ज :–**

फेडरेशनने निरनिराळ्या व्यक्ती व संस्था विरुध्द १७ रिट अर्ज दाखल केलेले असून फेडरेशन विरुध्द निरनिराळ्या व्यक्ती व संस्थांनी २१४ रिट अर्ज दाखल केलेले आहेत. त्यांची सुनावणी मुंबई, नागपूर, औरंगाबाद व अहमदाबाद येथील उच्च न्यायालयात चालू आहे.

या विभागाने कार्यालयातील सर्व विभागांना कामगार विषयक प्रश्नांबाबत वेळोवेळी कायदा विषयक सल्ला दिलेला आहे. तसेच युनियन, सेवक, कर्मचारीं वर्गाच्या संबंधातील कामगार तडजोडी संबंधात काम पाहिले आहे.

**कापूस खरेदी व प्रक्रिया :-**

१९८४–८५ हंगामातील पश्चिम महाराष्ट्रातील खरेदी दि. १०–९–८४ रोजी सुरू करण्यात आली व मुख्य हंगामातील म्हणजे विदर्भ, मराठवाडा व खानदेश येथील खरेदी दि. ५–११–८४ पासून सुरू करण्यात आली.

हंगाम १९८३–८४ व ८४–८५ हंगामात झालेली खरेदी खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | विभागाचे नाव | १९८३-८४ झालेली खरेदी (क्विं.) | बांधण्यात आलेल्या गाठी | १९८४-८५ झालेली खरेदी (क्विं.) | बांधण्यात आलेल्या गाठी | १९८४-८५ हंगामात झालेल्या वाढीव खरेदीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नागपूर | ६,९९,४६७ | १,३२,६०३ | १०,०१,१४२ | १,९९,२७३ | ४३.१२ |
| २) | यवतमाळ | ८,४५,४५९ | १,६०,६०८ | १७,३०,४४४ | ३,५४,८१९ | १०४.६७ |
| ३) | अकोला | ५,००,०९९ | १,००,६४१ | १२,१४,५६६ | २,६१,०५४ | १४२.८६ |
| ४) | अमरावती | ५,६७,३३४ | १,०८,३५९ | १०,८४,६८४ | २,२२,१२९ | ९१.१९ |
| ५) | खामगांव | ३,७३,१६४ | ६९,३५८ | ८,५४,४३७ | १,७२,१४९ | १२८.९७ |
| ६) | औरंगाबाद | ३,१०,६४२ | ५८,७३१ | ६,१०,२७५ | १,२२,१९२ | ९६.४५ |
| ७) | परभणी | ४,३२,०४० | ८८,१०७ | ११,१४,१६० | २,४०,१८२ | १५७.८८ |
| ८) | नांदेड | १,४७,८८२ | २८,८७० | ५,२२,९०७ | १,०४,४२९ | २५३.६० |
| ९) | जळगांव | ६३,७६९ | १२,३६५ | ३,९७,१७२ | ८४,३७१ | ५२२.८३ |
| १०) | धुळे | ६,१९८ | १,१६५ | ६८,२५३ | १३,८५८ | १,००१.२१ |
| ११) | फलटण/ नगर | ४५,३१२ | ८,५५४ | ५४,९३१ | १०,९०२ | २१.२३ |
| | **एकूण** | ३९,९१,३६६ | ७,६९,३६१ | ८६,५२,९७१ | १७,८५,३५८ | ११६.७९ |

या व्यतिरिक्त एकूण ८७७५ क्विं. रुई विभिन्न विभागांन्तर्गत खरेदी करण्यात आली.

या हंगामात गत हंगामाच्या तुलनेने ११६.७९ टक्क्यांनी खरेदीत वाढ झाली. खरेदीचे काम अकरा विभाग व पंच्याहत्तर उपविभागान्तर्गत करण्यात आले. गत हंगामातील ८० उपविभागांपैकी ८४–८५ हंगामात ७५ उपविभाग चालू करण्यात आले होते. ५ उपविभाग बंद करण्यात आले.

कापूस खरेदीसाठी २३५ सुविधा व ८३ असुविधा केंद्रे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ७१ असुविधा केंद्रे चालविण्यात आली. फेडरेशनचे धोरण कमीतकमी असुविधा केंद्रे सुरू करावीत असे आहे व त्यानुसार शासनास कळविण्यात आले आहे.

११ विभागान्तर्गत १४४ खरेदी विक्री संघ व १४० कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी योजने अन्तर्गत काम केले आहे. अहवाल काळात एकूण ४६७ जिनींग प्रेसिंग फॅक्टरींना काम देण्यात आले. त्यात सहकारी व खाजगी क्षेत्रातील फॅक्टरीजू खालीलप्रमाणे आहेत.

| क्षेत्र | एकूण युनिट | जिनिंग युनिट (सिंगल) | जिनिंग व प्रेसिंग युनिट (कंपोझिट) | फक्त प्रेसिंगची सोय असलेली |
|---|---|---|---|---|
| सहकारी | १९० | १५० | ४० | — |
| खाजगी | २७७ | २०२ | ७५ | ६ |
| एकूण | ४६७ | ३५२ | ११५ | ६ |

हंगाम १९८३–८४ व ८४–८५ मध्ये झालेल्या एकूण कापूस खरेदीमध्ये कापसाचे लांब, मध्यम व आखूड धाग्यांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| | हंगाम १९८३–८४ | | हंगाम १९८४–८५ | |
|---|---|---|---|---|
| कापसाची प्रत | खरेदी (क्विं.) | टक्केवारी | खरेदी (क्विं.) | टक्केवारी |
| लांब धाग्याचा कापूस | २५,८२,२५५ | ६४.६९ | ४८,६०,८४२ | ५६.१८ |
| मध्यम धाग्याचा कापूस | १०,७७,०२५ | २६.९८ | २४,९०,७११ | २८.७८ |
| आखूड धाग्याचा कापूस | ३,३२,०८६ | ८.३३ | १३,०१,४१८ | १५.०४ |
| एकूण | ३९,९१,३६६ | — | ८६,५२,९७१ | — |

हंगाम १९८३–८४ व १९८४–८५ मध्ये झालेल्या एकूण खरेदीची प्रतवार टक्केवारी खालीलप्रमाणे :—

| | हंगाम १९८३–८४ | | हंगाम १९८४–८५ | |
|---|---|---|---|---|
| प्रत | खरेदी (क्विं.) | टक्केवारी | खरेदी (क्विं.) | टक्केवारी |
| सुपर | २६,००,०३२ | ६५.१४ | ६१,४७,९३३ | ७१.०४ |
| एफएक्यू | १०,८३,९७३ | २७.१५ | २०,०९,२२० | २३.२२ |
| फेअर | २,६५,८५२ | ६.६६ | ४,४०,३९८ | ५.०८ |
| फडतर | २४ | — | १,७७३ | ०.०५ |
| एक्स | ३१,३०७ | ०.७८ | ४१,६२० | ०.४८ |
| कवडी | १०,१७८ | ०.२७ | १२,०२७ | ०.१३ |
| एकूण | ३९,९१,३६६ | — | ८६,५२,९७१ | — |

अहवाल सालात घटीची टक्केवारी ०.८२ एवढी आली आहे. जी १९८३–८४ हंगामात १.९२% एवढी होती.

**वाहतुकीपोटी झालेला खर्च :-** १९८४-८५

एकूण झालेल्या ८६,५२,९७१ क्विं. खरेदीपैकी ६,०९,९२४ क्विं. कापूस असुविधा केंद्रावर खरेदी करण्यात आला. सदर कापूस प्रक्रियेसाठी नजिकच्या सुविधा केंद्रावर वाहून नेण्यात आला. विभागवार असुविधा केंद्रावर झालेली खरेदी व वहातूक खर्च याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | उघडण्यात आलेली असुविधा केंद्रे | असुविधा केंद्रावरील एकूण खरेदी | रु. ५/- प्र. क्विं. दराने वहातूकी पोटी शेतकऱ्यांकडून वसूल करणेत आलेली रक्कम | एकूण वाहतूक खर्च (रु.) | वाहतूक पोटी योजनेवर करावा लागलेला अतिरिक्त खर्च | प्रति क्विंटल वाहतूक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | नागपूर | ४ | ३६,५९९.०० | १,८२,९९५.०० | ३,२२,८१२.०० | १,३९,८१७.०० | ८.८२ |
| २. | यवतमाळ | १५ | १,४६,६३७.५९ | ७,३३,१८५.०० | १५,७६,६७४.२२ | ८,४३,४८९.२२ | १०.८५ |
| ३. | अकोला | १ | ६,७७६.०० | ८८०.०० | ४७,९४९.४२ | १४,०६९.४२ | ७.०७ |
| ४. | अमरावती | ७ | ८९,४८९.६८ | ४,४७,४४८.४० | ५,७०,९९३.९४ | १,२३,५४५.५४ | ६.३८ |
| ५. | खामगांव | २ | २०,१२५.५४ | १,००,६२७.७० | १,६५,२९०.५६ | ६४,६६२.८६ | ८.२१ |
| ६. | औरंगाबाद | ११ | १,१५,५६२.०० | ५,७७,८१०.०० | ११,३८,५०७.०० | ५,६०,६९७.०० | ९.८५ |
| ७. | परभणी | १३ | १,११,७८४.३९ | ५,५८,९२१.९५ | ११,१९,७४८.१७ | ५,६०,८२६.२२ | १०.०२ |
| ८. | नांदेड | ४ | ४४,९८५.०६ | २,२४,९२५.३० | ५,०७,७०२.८४ | २,८२,७७७.५४ | ११.२८ |
| ९. | जळगांव | २ | १६,२९५.०८ | ८१,४७५.४० | १,२५,५५५.७४ | ४४,०८०.२४ | ७.७० |
| १०. | धुळे | — | — | — | — | — | — |
| ११. | फलटण | १२ | २१,६६९.७८ | १,०८,३४८.९० | ३,१९,७२३.२४ | २,११,३७४.३४ | १४.७५ |
| एकूण : | | ७१ | ६,०९,९२४.१२ | ३०,४९,६१७.६५ | ५८,९४,९५७.१३ | २८,४५,३३९.४८ | ९.६६ |

अहवाल काळात (१९८४–८५) काळात एकूण २३५ सुविधा केंद्रांवर कापूस खरेदी करण्यात आली. ज्या सुविधा केंद्रावरील प्रक्रिया क्षमता अपूरी पडली तेथील कापूस नजीकच्या केंद्रावर वाहतूक करावा लागला. अशाप्रकारे वहातूक करण्यात आलेल्या कापसाची विभागवार करण्यात आलेली वाहतूक व वहातूक खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | विभागाचे नांव | एकूण खरेदी (क्विंटल) | वाहतूक करण्यात आलेला कापूस (क्विंटलमध्ये) | एकूण खर्च रुपये | प्र. क्विंटल खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) | नागपूर | ३,३३,०६० | १,०६,७५८ | ६,९४,१०३.०० | ६.५० |
| २) | यवतमाळ | ४,६९,४२५ | १,९०,७०२ | १६,१९,१८०.०० | ८.४९ |
| ३) | अकोला | १,९४,९४६ | ५२,५६७ | ४,०४,९५९.२३ | ७.७० |
| ४) | अमरावती | ३,०४,१९५ | ७५,२७४ | ४,०९,१५२.५२ | ५.४३ |
| ५) | खामगांव | १,५१,१६५ | ४५,१९७ | ३,५५,१९२.५४ | ७.८५ |
| ६) | औरंगाबाद | १,५२,०२८ | २५,४५८ | २,८०,१२८.७० | ११.०० |
| ७) | परभणी | ३,१४,२६६ | ५५,१८८ | ५,१९,८२४.६७ | ९.४१ |
| ८) | नांदेड | ३,३५,०२० | ५३,३९२ | ५४,५८,६१८.४३ | ८.५८ |
| ९) | जळगाव | — | — | — | — |
| १०) | धुळे | — | — | — | — |
| ११) | फलटन | ३,१४२ | ३७५ | ५,१२२.२३ | १३.९० |
| | एकूण | २२,५७,९४७ | ६,०४,९११ | ४७,४६,३८१.३२ | ७.८४ |

हा खर्च उपलब्ध असलेल्या प्रक्रिया क्षमता अपुरी असल्याने करावा लागला आहे. तो कमी करण्याच्या दृष्टीने विस्तार योजना हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे. बऱ्याच केंद्रावर खाजगी क्षेत्रात प्रक्रिया संस्था उभारल्या जातात व सहकार खात्यामार्फत फेडरेशनशी कोणत्याही प्रकारचा विचारविनिमय न करता त्यांना मान्यता दिली जाते. फेडरेशनचे धोरण अशाप्रकारे उघडण्यात येणाऱ्या नवीन प्रक्रिया संस्था या फक्त सहकारी क्षेत्रातच असाव्यात आणि कमीत कमी रेचे असावेत असा आहे. अहवाल काळात १४,१०,००० क्विं. रुईची वाहतूक करण्यात आली व त्यावर वाहतूक पोटी १३८ लक्ष खर्च करावा लागला.

वरील खर्च टाळण्यासाठी नवीन प्रक्रिया केंद्रावर प्रेसची सुविधा असणे जरुरी आहे.

**कापूस विक्री :–**

फेडरेशनने कापूस विक्रीसाठी विभागीय स्थरावर कोईमतुर, अहमदाबाद, कलकत्ता आणि शिवडी (मुंबई) येथे विक्री कार्यालये उघडली आहेत. हेंगामाचे सुरवातीला गाठी बांधल्यावर ब्रोकर्स, मुकादम आणि मिल्स खरेदीदार यांना कापसाचे नमुने देवून तसेच त्यांच्या परिषदा भरवून आपल्या कापसाबद्दलची माहिती देण्यात येते. विक्री अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी खरेदीदार मिल्सच्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष भेटून कापूस विक्रीसाठी प्रयत्न करण्यात येतात. सबंध देशातील निरनिराळ्या प्रांतातील प्रमुख खरेदीदार मिल्स आणि संस्था यांना पण प्रत्यक्ष भेटून त्यांना सॅम्पल्सचा पुरवठा आणि प्रचलित भावांची माहिती देवून कापूस विक्रीसाठी प्रयत्न करण्यात येतात.

अहवाल सालात भारतात झालेले कापसाचे विक्रमी उत्पादन व मागील गांठींचा शिल्लक साठा, मागील हंगामात मिल्समधील संपामुळे गिरण्यांची कापूस वापराची कमी झालेली क्षमता, पाकिस्तान कडून दोन लाख गाठी आयात करण्याची घोषणा (७५,००० गांठी प्रत्यक्षात आयात करण्यात आल्या.) नवीन टेक्स्टाईल पॉलिसीमुळे कापसाचे वापरावर झालेला विपरीत परिणाम या सर्व कारणास्तव कापसाचे भाव सारखे घटले एवढेच नव्हे तर त्याचे विक्रीवर विपरीत परिणाम झाला. त्यामुळे कापूस हंगाम ८४.८५ अखेर सबंध देशात तसेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कापूस अविक्रीत राहिला.

शिल्लक असलेल्या गाठींच्या विक्रीसाठी कसोशीचे प्रयत्न सुरू आहेत.

**कापूस निर्यात :-**

केंद्र सरकारने अहवालसाली सन ८४–८५ हंगामातील ९५,००० कापूस गाठींचे निर्यात परवाने दिले होते. दि. ३१–८–८५ अखेर पर्यंत एकूण ६५,९३० कापूस गाठी निर्यात करण्यात आल्या व त्यापोटी योजनेला १९.७३ कोटी रुपये मिळाले आहेत.

सन ८४–८५ हंगामातील निर्यात केलेल्या गाठींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| कापसाची जात | निर्यात केलेल्या गाठी |
|---|---|
| एच – ४ | ५५,६०० |
| वरलक्ष्मी | ७,०२५ |
| डीसीएच – ३२ | ३,३०५ |
| एकूण – | ६५,९३० |

वरील ६५,९३० गाठी या प्रामुख्याने जपान, झेकोस्लाविया, इंग्लंड, रशिया, श्रीलंका, वेस्ट जर्मनी या देशांना पाठविण्यात आल्या.

मार्च ८५ पर्यंत मिळालेल्या ६५,००० गाठींच्या निर्यात परवान्या पोटी फेडरेशनने निर्यात सौदे परदेशी खरेदीदारांशी करून या सर्व गाठींची निर्यात जून ८५ अखेर पूर्ण केली, परंतु पुढील ३०,००० गाठींचे निर्यात परवाने उशीरा (जुलै ८५ मध्ये) मिळाल्यामुळे मार्च ते जून या कालावधीत परदेशी खरेदीदारांकडून मागणी असून सुध्दा निर्यात सौदे परवान्या अभावी करता आले नाहीत. जून ८५ मध्यें केंद्र सरकारने देशात भरपूर कापूस साठा असून सुध्दा दोन लाख गाठींची आयात करण्याचा निर्णय घेतला परंतु नंतर फेरविचार करून जुलै आणि ऑगस्ट ८५ मध्ये ७५,००० गाठींचा पाकिस्तानी कापूस आयात झाला आणि त्यामुळे स्थानिक बाजार परिस्थितीवर विपरीत परिणाम होऊन फेडरेशनच्या कापसास मागणी कमी झाली.

**परदेशी खरेदीदारांनी फेडरेशन विरुद्ध केलेले लवाद दावे : –**

१९८२–८३ सालात फेडरेशनने केंद्र सरकारकडून मिळालेल्या आश्वासनावरून एकूण ७ लाख गाठींचे निर्यात सौदे विदेशी खरेदीदाराशी केले होते. परंतू केंद्र सरकारने निर्यात परवाने न दिल्यामुळे शेवटी २.५० लाख गाठींची निर्यात फेडरेशन करू शकले नाही.

परदेशी खरेदीदारांनी या निर्याती अभावी ईस्ट इंडिया कॉटन असोशिएशनकडे लवाद दावे मांडले असून त्यापोटी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. ती रक्कम अंदाजे ९ कोटी होईल. आतापर्यंत तीन लवाद दावे निकालात निघाले असून फेडरेशनने परदेशी खरेदीदारांना त्यांनी मागणी केलेली नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम द्यावी असे आदेश ई.आय्.सी.ए.च्या संचालक मंडळाने दिले आहेत. या आदेशाविरुध्द फेडरेशनने मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केली आहेत.

या लवाद दाव्यांमुळे परदेशी खरेदीदारांकडून आपल्या कापसाच्या मागणीस योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. याशिवाय अमेरिकेतील कापसाचा भरपूर साठा, चीन आणि पाकिस्तान या देशातील कापसाचे विक्रमी उत्पादन यामुळे जागतिक बाजारपेठेतील कापसाच्या किंमती खूपच घसरल्या आहेत.

सरकी :

कापसाचे जिनिंग होऊन उपलब्ध झालेली सरकी विभागीय पातळीवर जाहिर लिलावाने विक्री करण्यांत येते. शासनाच्या आदेशानुसार काही सरकी पुढील हंगामात पेरणीसाठी राखून ठेवली जाते. तसेच सहकारी व निमसरकारी संस्थांना त्यांचे मागणी नुसार आरक्षण तत्वावर सरकी विक्री करण्यात येते.

अहवाल सालात एकूण ५५,३३,५७७ क्विंटल सरकी उपलब्ध झाली. शासनाच्या आदेशाप्रमाणे ८७,४४९ क्विंटल सरकी बियाण्याकरिता राखून ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३७,६७४ क्विंटल सरकी बियाण्याचे वाटप खरेदी विक्री संघामार्फत शेतकऱ्यांना करण्यात आले. महाराष्ट्र राज्य तेलबिया वाणिज्य व औद्योगिक महामंडळ मुंबई, महाराष्ट्र स्टेट को–ऑप. मार्के. फेंड लि. मुंबई व बियाणे महामंडळ अकोला यांना लिलावातील स. दराने १,४८,०२२ क्विंटल सरकी विक्री करण्यात आली. तसेच गुरांच्या खाद्याकरीता ८१०२ क्विंटल सरकी शेतकऱ्याना लिलावातील दराने विक्री करण्यात आली आहे. अहवाल वर्षाच्या अखेरीस शिल्लक राहिलेल्या ८३९ क्विंटल सरकीची नंतर विक्री करण्यात आली. विभागवार लिलावाने तसेच सहकारी व निमसरकारी संस्थांनाआरक्षण तत्वावर विक्री केलेल्या सरकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सरकी क्विंटलमध्ये

| अ.नं. तपशिल | नागपूर | यवतमाळ | अकोला | अमरावती | खामगांव |
|---|---|---|---|---|---|
| ब) | | | | | |
| १) एकूण उपलब्ध सरकी | ६४५३६५ | ११०३८४६ | ७६६२८५ | ६८३५२९ | ५५८८८३ |
| २) लिलावाने विकलेली एकूण सरकी | ६४४१७१ | १०,८१,१०५ | ७०६७४८ | ६७००३४ | ५४१३७८ |
| स. दर | २२४.९२ | २२०.७८ | २२४.५७ | २२२.८७ | २२८.५८ |
| ३) बियाण्याकरिता विक्री | ८४४ | ५९० | ३९१४ | २३३७ | १९२७ |
| स. दर | २८४.२५ | ३११.९२ | २७७.४८ | २९०.०० | २८७.९० |
| ४) तेलबिया महामंडळाला विकलेली सरकी | — | २०००० | — | ९९२० | — |
| स. दर | — | २३१.५४ | — | १९९.३५ | — |
| ५) सहयोग तेल गिरणी, जालना याना विकलेली | — | — | — | — | ५५३६ |
| स. दर | — | — | — | — | २३५.३१ |
| ६) बियाणे महामंडळ, अकोला | १२४ | १२८१ | ३०,४९७ | — | ९२२६ |
| स. दर | २०५.५० | २२४.०० | २४४.६२ | — | २५४.१४ |
| ७) गुरांच्या चराईकरिता विकलेली | १०९ | ६०० | ४९०८ | १२३१ | ७९१ |
| स. दर | १३०.०४ | २२१.२१ | २१०.४७ | १९५.२१ | २२०.१३ |
| ८) एकूण विक्री (२ ते ७) | ६४५२४८ | ११०३५७६ | ७६६०६७ | ६८३५२२ | ५५८८५८ |
| स. दर | २२५.३६ | २२१.२१ | २२४.९५ | २२१.१० | २२९.३६ |
| ग) अविक्रीत सरकी | ११७ | २७० | २१८ | ७ | २५ |

व दर प्रति क्विंटल

| औरंगाबाद | परभणी | नांदेड | जळगांव | धुळे | फलटण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४०३७१७ | ७०२४०८ | ३३८२१८ | २५१५१० | ४३९०२ | ३५९१४ | ५५,३३,५७७ |
| ३८३९९३ | ६६३४०९ | ३३१६३२ | २२१८३० | ३८७६४ | ३५८७६ | ५३,३८,९४० |
| २२२.३० | २१९.८३ | २२०.२८ | २२६.७३ | २३२.३९ | २२१.४८ | २२३.१४ |
| २७३६ | ४९९१ | १६४७ | १३८९० | ४७९८ | — | ३७,६७४ |
| २७५.०० | २७५.३४ | २७५.२० | २७५.१५ | २७२.११ | — | २७७.३५ |
| — | — | ४४०० | — | — | — | ३४,३२० |
| — | — | २३१.४८ | — | — | — | २२२.२० |
| १६९०० | २५२२५ | — | — | — | — | ४७६६१ |
| २३८.९२ | २२६.०५ | — | — | — | — | २३१.६९ |
| — | ८७८३ | — | १५७९० | ३४० | — | ६६,०४१ |
| — | २४४.०८ | — | २५२.५२ | २६८.०० | — | २४७.५० |
| ६३ | — | ४०० | — | — | — | ८,१०२ |
| १००.५८ | — | २१५.१२ | — | — | — | १७८.५२ |
| ४०३६९२ | ७०२४०८ | ३३८०७९ | २५१५१० | ४३९०२ | ३५८७६ | ५५,३२,७३८ |
| २२३.३४ | २१९.८४ | २२०.६८ | २३०.७३ | २३६.८९ | २२१.४८ | २२३.५३ |
| २५ | — | १३९ | — | — | ३८ | ८३९ |

## आर्थिक समालोचन :-

(कापूस योजना विभाग)

हंगाम १९८४-८५ च्या कापूस खरेदीची सुरुवात पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऑगस्ट ८४ पासून झाली. शेतकऱ्याकडून खरेदी केलेल्या कापसाचे पैसे देण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रु. २.५० कोटी रुपयांची कर्जमर्यादा मंजूर करून घेतली होती. परंतू त्यावेळी योजनेकडे आवश्यक तो निधी उपलब्ध असल्यामुळे ह्या कर्ज मर्यादेमधून कर्ज उचलण्याची आवश्यकता भासली नाही.

१९८४-८५ चा कापूस खरेदीचा मुख्य हंगाम विदर्भ, मराठवाडा व खानदेश विभागात नोव्हेंबर ८४ मध्ये सुरु करण्यात आला. ज्या शेतकऱ्यांनी फेडरेशनकडे कापूस दिला त्यांना हमी दराप्रमाणे किंमत अदा करण्याकरीता महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक व नाबार्ड यांचेकडून वेळोवेळी खालील प्रमाणे कर्ज मर्यादा मंजूर करुन घेण्यात आल्या.

| | |
|---|---|
| ७.१२.८४ | १२० कोटी |
| २२.१.८५ | १९० कोटी (७० कोटी वाढ) |
| ३१.१.८५ | २५० कोटी (नंतर ६० कोटीची वाढ) |
| २१.२.८५ | २८५ कोटी (नंतर ३५ कोटीची वाढ) |

१९८४-८५ हंगामात कापूस ८६,५२,९७० क्विं. व रुई ८८१६ क्विं. खरेदी करण्यात आली. त्याची हमी दराप्रमाणे एकूण किंमत रु. ४,९२,३९,२४,०४३/- आली. महाराष्ट्रामध्ये या हंगामात खरेदी केलेल्या कापसाची सरासरी दर ५६७.८३ रुपये प्र.क्विं. व रुईचा सरासरी दर ११८४.०२ असा पडतो. १९८४-८५ हंगामात शेतकऱ्यांना १००% किंमत अदा करण्यात आली. शेतकऱ्यांना हमी किंमत अदा करताना नियमानुसार त्या रकमेतून सहकारी कर्ज वसुली व ३% प्रमाणे भांडवल उभारणी निधीची कपात करण्यात आली. बँकेची एकूण कर्ज वसुली रु. ६०.४० कोटी व भांडवल उभारणी रु. १४.७७ कोटी एवढी रक्कम शेतकऱ्याकडून कापून घेण्यात आली.

हंगाम ८४-८५ मध्ये एकूण २७१ आगी लागून एकूण रु. १,९१,५३,०२५/- चे नुकसान झाले. या २७१ आगींच्या क्लेम पैकी दि. ८.४.८६ पर्यंत २४० क्लेम मंजूर होऊन रु. १,२८,१३,५८१ इतकी रक्कम विमा कंपनी कडून प्राप्त झाली. उर्वरीत क्लेम प्रलंबित असून त्यामध्ये रु. ६३,३९,४४४/- इतकी रक्कम अंतर्भूत आहे. सदरचे प्रलंबित क्लेम मंजूर करुन घेण्याबाबत कार्यवाही चालू असून ते क्लेम लवकरच मंजूर होतील.

हंगाम १९८४-८५ मध्ये एकूण रु. ४,६७,१६,६२६ इतका विमा हप्ता दिला. सदर हंगामातील एकूण रु. १,९१,५३,०२५ च्या नुकसानीचे एकूण खरेदीच्या किंमतीशी टक्केवारीचे प्रमाण ०.३९% इतके आहे.

८४-८५ हंगामाचे योजना अंतर्गत हिशोब पुर्ण करण्यात येत आहेत. एकंदरीत खरेदीचा दर व गाठींची विक्री तसेच सरकीची विक्री विचारात घेता साधारणतः हंगाम १९८४-८५ मध्ये रु. ७५ कोटी पर्यंत नुकसान येण्याचा संभव आहे.

## आर्थिक समालोचन :

आपल्या संस्थेचे १९८४-८५ हे पहिले आर्थिक वर्ष आहे. संस्थेच्या वार्षिक हिशोबाच्या दृष्टिने "कापूस योजनेंतर्गत हिशोब" व "योजना बाह्य हिशोब" असे दोन विभाग करण्यात आले आहेत. योजनेंतर्गत हिशोबामध्ये कापूस खरेदी-प्रक्रिया खर्च व विक्रीचा खर्च तथा योजनेची मालमत्ता वगैरे अंतर्भूत आहे. तर योजनाबाह्य हिशोबामध्ये कापूस एकाधिकार योजना राबविण्यासाठी मिळणारे मुख्य अभिकर्ता कमिशन (चिफ एजन्सी कमिशन) विचारात घेऊन त्या आधारे झालेला प्रशासकीय खर्च व संस्थेची मालमत्ता याचा समावेश आहे.

कापूस एकाधिकार योजनेअंतर्गत हिशोब स्वतंत्रपणे तयार करण्यात येऊन महाराष्ट्र शासनास सादर केले जातात. यास्तव त्या हिशोबाचा समावेश सदरहू अहवालात केलेला नाही परंतू या संबंधीची आवश्यक ती माहिती या अहवालात इतरत्र देण्यात आलेली आहे.

वर उल्लेखिल्या प्रमाणे योजनाबाह्य हिशोबाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

**कमिशन**

८४-८५ या हंगामामध्ये झालेली कापसाची एकूण खरेदी ४९२.३९ कोटी रुपये व या रक्कमेवर २ टक्के दराने ९८४.७८ लक्ष रुपये एवढे कमिशन विचारात घेण्यात आलेले आहे. सदर कमिशनची मागणी महाराष्ट्र शासनाकडे करण्यात येईल. व त्या प्रमाणे १९८४-८५ या हंगामाचे कापूस योजना हिशोबामध्ये मुख्य अभिकर्ता कमिशनची तरतूद करण्यात येईल.

**प्रशासकीय खर्च :**

१९८४-८५ या वर्षामध्ये सदरचा खर्च ८.७१ कोटी रुपये झालेला आहे. शीर्षक निहाय खर्च नफा तोटा पत्रकात दाखविला आहे.

**निव्वळ नफा**

अहवाल साली निव्वळ नफा रु. १,१४,८५,८६०.६० झालेला आहे.

कापूस एकाधिकार योजना राबविण्यासाठीं महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन ऐवजी आपल्या संस्थेची नियुक्ती केल्यामुळे मार्केटिंग फेडरेशनच्या कापूस योजनाबाह्य विभागाचे १५.१०.८४ अखेरचे अंतीम ताळेबंदानुसार येणी, देणी व मालमत्ता आपल्या संस्थेकडे वर्ग करण्यात आली असून त्याचा समावेश या हिशोब पत्रकामध्ये केलेला आहे.

**नफा वाटणी शिफारस**

नफातोटा पत्रकानुसार ३०–९–१९८५ अखेर संपलेल्या वर्षाचा निव्वळ नफा रु. १,१४,८५,८६०.६० नफा वाटणी करिता उपलब्ध आहे.

याची नफा वाटणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस आहे.

| | | रुपये पैसे |
|---|---|---|
| निव्वळ नफा | | १,१४,८५,८६०.६० |
| १) | व्यापारी निधी पोटनियम ६१ (अ) प्रमाणे निव्वळ नफ्याचे २५ टक्के | २८,७१,४६५.०० |
| २) | गंगाजळी पोटनियम ६१ (ब) प्रमाणे निव्वळ नफ्याचे २५ टक्के | २८,७१,४६५.०० |
| ३) | इमारत निधी | ५५,००,०००.०० |
| ४) | धर्मदाय निधी | १,००,०००.०० |
| ५) | शिल्लक पुढील वर्षाकरीता | १,४२,९३०.६० |
| | एकूण | १,१४,८५,८६०.६० |

**समारोप :–**

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि. या संस्थेने अहवाल सालात कापूस खरेदी प्रक्रिया कापूस गांठी विक्री, निर्यात, सरकी विक्री या निरनिराळ्या विभागामार्फत केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त अहवाल तसेच सदर विभागांनी आपापल्या कार्यक्षेत्रात केलेली व्यापारी व आर्थिक उलाढाल आपणास सादर केली आहे.

संचालक मंडळातील माझ्या सहकाऱ्यांनी संस्था प्रगती पथावर रहावी म्हणून जे प्रयत्न केले त्यांचा उल्लेख ह्या अहवालाचा समारोप करतांना जरुर केला पाहिजे. त्याच प्रमाणे अहवालसाली संस्थेने जे कार्य केले आहे. त्यात फेडरेशनच्या सभासद संस्थाच्या सहकार्याचाही हातभार कारणीभूत आहे. त्यांच्या बहुमोल सहकार्यामुळेच संस्था प्रगती कडे वाटचाल करू शकली त्याबद्दल सर्व सभासदांचे आम्ही ऋणी आहोत. राज्यातील इतर सहकारी संस्थाकडूनही फेडरेशनला वेळोवेळी सहकार्य लाभले असून सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचेही फेडरेशनला सतत सक्रीय सहकार्य मिळाले आहे.

महाराष्ट्र शासनाचे कृषि व सहकार खात्याचे सचिव व त्यांचे सहकारी, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, डायरेक्टर ऑफ मार्केटिंग जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) व जॉइंट रजिस्ट्रार या सर्वांच्या सहकार्यामुळेच आमचे काम सुलभ झाले. त्यांच्या सहकार्याचा ऋण निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांचेही फेडरेशनला बहुमोल सहकार्य लाभले असून त्यांचेही आम्ही आभारी आहोत.

फेडरेशनचे हिशोब तपासणीचे काम अत्यंत जागरुकपणे करणारे जॉईंट रजिस्ट्रार को-ऑप. सोसायटीज (ऑडिट) श्री. शेवडे यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व त्यांच्या मार्गदर्शना बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अहवालसाली फेडरेशनला अनेक सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व इतर राज्यातील सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचप्रमाणे राज्याच्या मंत्रीमहोदयानी भेटी देऊन आणि फेडरेशनच्या कार्याची माहिती घेऊन फेडरेशनच्या कार्याचा गौरव केला आहे त्याबद्दल त्यांचे मी हार्दिक आभार मानतो.

संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. बा. क. अग्रवाल यांनी नविन संस्थेला तोंड द्याव्या लागणाऱ्या प्रश्नांची नीट अभ्यास करुन त्यांची सुलभरित्या उकल केली त्या त्यांच्या सहकार्याचाही मी अगत्यपूर्वक उल्लेख करीत आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या सेवक मंडळींनी तत्परतेने व जबाबदारीची जाणीव ठेऊन आपले कर्तव्य पार पाडले आहे याचाही उल्लेख या ठिकाणी करणे जरुर आहे.

वर नमूद केलेली मान्यवर मंडळी, प्रतिनिधी, हितचिंतक अधिकारी व सेवक यांनी केलेल्या बहुमोल सहकार्याचा पुन्हा एकदा अंतःकरणपूर्वक उल्लेख करुन मी त्यांना धन्यवाद देतो आणि फेडरेशनच्या यापुढील विविध स्वरुपाच्या कामांमध्ये त्यांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करतो.

**छ. आ. केदार**
अध्यक्ष
संचालक मंडळाच्या वतीने व करिता

## लेखापरीक्षकांचे प्रमाणपत्र

मी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, मुंबई या संस्थेने राबविलेल्या एकाधिकार कापूस खरेदी योजनेच्या "योजनाबाह्य विभाग" लेखांचे सन १९८४–८५ मुदतीचे लेखापरीक्षण केले असून खालीलप्रमाणे अहवाल करीत आहे.

लेखा परीक्षण प्रतिवृ–तांतील शेऱ्यास पात्र राहून मला दिलेल्या माहिती प्रमाणे व सादर करण्यांत आलेल्या कागदपत्रांप्रमाणे "योजनाबाह्य विभागाचे" १६.१०.१९८४ ते ३०.९.१९८५ या मुदतीचे नफा–तोटा पत्रक व ३०.९.१९८५ चा ताळेबंद महाराष्ट्र सहकारी कायदा व कानू, संस्थेचे पोट–नियम तसेच कच्चा कापूस कायदा (खरेदी, प्रक्रिया व पणन) १९७१ यांना विहित असलेली सर्व माहिती देत आहे, व

(१) १९८४–८५ या मुदतीत दाखविलेल्या नफ्याची,

(२) दिनांक ३०.९.१९८५ च्या ताळेबंदात दाखविलेल्या आर्थिक स्थितीची सत्य व रास्त माहिती देत आहे.

लेखापरीक्षण प्रतिवृत्तांतातील शेऱ्यास पात्र राहून,

(१) माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे लेखा परीक्षणासाठी लागणारी सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

(२) लेखा परीक्षण करीत असता जेवढे दृष्टोत्पत्तीत येईल तेवढ्यावर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा, कानू व संस्थेचे पोट–नियम याला अनुसरुन संस्थेने आपली पुस्तके ठेवली आहेत.

(३) मी तपासलेले १६.१०.१९८४ ते ३०.९.१९८५ मुदतीचे नफा–तोटा पत्रक व दिनांक ३०.९.१९८५ चा ताळेबंद संस्थेने ठेवलेल्या लेखा पुस्तकाशी व तक्त्याशी जुळत आहे.

श्री. ना. शेवडे

सहनिबंधक, सहकारी संस्था(लेप) कपास,
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन
महासंघ मर्यादित, मुंबई.

स्थळः मुंबई.
२८.४.८६

# ताळेबंद व
# नफा-तोटा पत्रक
# १९८४-८५

## दि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस

### ३० सप्टेंबर १९८५ अखेर

| तपशील | १९८३–८४ रु. पैसे |
|---|---|
| बँक कमिशन | ५,९३४.६२ |
| सेवक पगार व भत्ते | ५,१७,३६,००२.९० |
| सेवक भविष्य निर्वाह निधी व वैद्यकिय मदत निधी | ४०,२६,४२२.२२ |
| कार्यकारी संचालकाचे पगार व भत्ते | ६३,७०३.६५ |
| कार्यकारी संचालकाचे प्रवास व इतर खर्च | २४,१६०.१० |
| संचालक मंडळ व उपसमित्यांची बैठक फी व प्रवासभत्ता आणि विभागीय सल्लागार समित्यांचा खर्च | ३,६५,७५८.६० |
| प्रवास खर्च (बाहेरील व स्थानिक) | २८,९१,०५२.३३ |
| कार्यालयांचे भाडे व वीजखर्च | २६,६४,३६८.८६ |
| टपाल, दूरध्वनी व तार खर्च | १७,९९,०५७.३७ |
| छपाई व स्टेशनरी | १४,७७,४६२.०४ |
| तपासणी व व्यावसायिक शुल्क | ४२,२९,९०६.९१ |
| सर्वसाधारण खर्च | १०,२६,०८७.७२ |
| कायम जिंदगीवरील घसारा | ६,६९,३८१.६७ |
| मोटार गाड्यांवरील खर्च | ९,०८,५३५.२१ |
| कार्यालयीन सामान दुरुस्ती व देखभाल खर्च | २,९१,१५८.२४ |
| जाहिरात खर्च | २,३६,३६७.१६ |
| वर्गणी | ७८,३५६.७२ |
| विमा खर्च | ५३,५४४.५० |
| सेवक बोनस | ८५,४२,४६४.०० |
| सेवक ग्रॅच्युइटी | ३०,००,०००.०० |
| शिक्षण निधी | १,००,०००.०० |
| कापूस भांडवल उभारणी निधी | २९,५४,४००.०० |
| निव्वळ नफा | १,१४,८५,८६०.६० |
| एकूण | ९,८६,२९,९८५.४२ |

लेखा परीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून
एस. एन. शेवडे
सहनिबंधक सहकारी संस्था (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य
सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित,
सतत व समवर्ती लेखा परीक्षण, मुंबई १५.

टी. ए. देशमुख
प्रमुख लेखाधिकारी

## उत्पादक पणन महासंघ मर्यादित.

### संपणाऱ्या वर्षाचे नफा तोटा पत्रक

| तपशील | १९८४–८५<br>रु. पैसे |
|---|---|
| बँकेकडून मिळालेले व्याज | ७,२६६.६२ |
| मिळालेले व्याज (इतर) | १,०८,३५०.०० |
| ज्यादा झालेल्या तरतुदी जमा | ५,६३३.०९ |
| किरकोळ जमा | ३०,२५५.७१ |
| मुख्य अभिकर्ता कमिशन | ९,८४,७८,४८०.०० |
| एकूण | ९,८६,२९,९८५.४२ |

| एस. एन. शहा | बी. के. अग्रवाल | शामराव कदम | छ. आ. केदार |
|---|---|---|---|
| मुख्य लेखा व आर्थिक अधिकारी | कार्यकारी संचालक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# दि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस

३० सप्टेंबर १९८५

| भाग भांडवल व देणे | १९८४–८५<br>रु. पैसे |
|---|---|
| अधिकृत भागभांडवल | ५०,००,००,०००.०० |
| भाग भांडवल<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १ प्रमाणे | १५,३१,९९४.०० |
| गंगाजळी व इतर निधी<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. २ प्रमाणे | ६०,६३,१२०.९५ |
| अनामत व ठेवी (मिळालेल्या)<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.३ प्रमाणे | २,०५,६९४.७३ |
| खर्चासाठी केलेल्या तरतूदी<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ४ प्रमाणे | २,००,२७,४२५.०१ |
| इतर देणी<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.५ प्रमाणे | १,६४,००,४२०.१७ |
| भविष्य निर्वाह निधी (हंगामी सेवक वर्गणी) | ४६,४०,३९२.१६ |
| भविष्य निर्वाह निधी (हंगामी सेवकासाठी संस्थेची वर्गणी) | ४६,४३,८८२.७० |
| एकाधिकार कापूस योजना खाते | ५,८०,६३,४५१.१५ |
| निव्वळ नफा<br>सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ६ प्रमाणे | १,१४,८५,८६०.६० |
| एकूण | १२,३०,६२,२४१.४७ |

लेखा परीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून

एस. एन. शेवडे
सहनिबंधक सहकारी संस्था (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य
सहकारी कापूस उत्पादक पणन महासघ मर्यादित,
सतत व समवर्ती लेखा परीक्षण, मुंबई १५.

टी. ए. देशमुख
प्रमुख लेखाधिकारी

## उत्पादक पणन महासंघ मर्यादित. मुंबई

### अखेरचे ताळेबंद पत्रक

| मालमत्ता व येणे | १९८४–८५ रु. पैसे |
|---|---|
| हातातील व बँकेतील शिल्लक सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ७ प्रमाणे | २९,५९,८५५.७९ |
| वहान कर्ज, ठेवी व अनामत येणे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ८ प्रमाणे | ७६,३४,९७७.६९ |
| येणे व्याज | ६१२.८० |
| मिळावयाचे क्लेम्स | ३५,३३७.५३ |
| मुख्य अभिकर्ता कमिशन येणे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.९ प्रमाणे | ९,८४,७८,४८०.०० |
| कायम जिंदगी सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १० प्रमाणे | ४७,३१,८५६.४५ |
| भविष्य निर्वाहनिधी (हंगामी सेवक) | ९२,२१,१२१.२१ |
| एकूण | १२,३०,६२,२४१.४७ |

| एस. एन. शहा | बी. के. अग्रवाल | शामराव कदम | छ. आ. केदार |
|---|---|---|---|
| मुख्य लेखा व आर्थिक अधिकारी | कार्यकारी संचालक | उपाध्याक्ष | अध्यक्ष |

## अधिकृत भाग भांडवल

| तपशील | १९८४–८५ रु. पैसे |
| --- | --- |
| ५०,००,००० भाग प्रत्येकी रु. १००/– चे | ५०,००,००,०००.०० |
| एकूण | ५०,००,००,०००.०० |

## परिशिष्ट-१

### भरपाई झालेले भाग भांडवल

| तपशील | १९८४–८५ रु. पैसे |
| --- | --- |
| महाराष्ट्र राज्य सरकारने धारण केलेले १५,००० भाग प्रत्येकी रु. १००/– प्रमाणे रिडिमेबल प्रेफरन्स शेअर्स पूर्ण भरपाईचे | १५,००,०००.०० |
| सहकारी संस्थांनी धारण केलेले २४८ भाग प्रत्येकी रु. १००/– प्रमाणे पूर्ण भरपाईचे | २४,८००.०० |
| भागापोटी अनामत | ७,१९४.०० |
| एकूण | १५,३१,९९४.०० |

Govt.

Society

## परिशिष्ट-२

### गंगाजळी व इतर निधी

| तपशील | १९८४–८५ रु. पैसे |
| --- | --- |
| गंगाजळी (प्रवेश फी) | ३,३३०.०० |
| भांडवल उभारणी निधी | २९,५४,४००.०० |
| सेवानिवृत्ती वेतन निधी | ३०,०५,३९०.९५ |
| शिक्षण निधी | १,००,०००.०० |
| एकूण | ६०,६३,१२०.९५ |

## परिशिष्ट-३

### अनामत व ठेवी (मिळालेल्या)

| तपशील | रु. पैसे | १९८४–८५ रु. पैसे |
|---|---|---|
| **अनामत** | | |
| सेवक अनामत (प्रवास खर्च) | १,१४,९७१.२३ | |
| सेवक अनामत (सण व उत्सव) | ९,९०७.५० | |
| सेवक अनामत (कार्यालयीन खर्च) | १,२४७.८७ | |
| इतर अनामत | ११,०७४.४१ | १,३७,२०१.०१ |
| **वाहन कर्ज जमा** | | २४,०९५.१२ |
| **ठेवी** | | |
| सुरक्षा ठेवी | २३,०००.०० | |
| छपाई व स्टेशनरी | २०,०४८.६० | |
| निविदा ठेवी | १,३५०.०० | ४४,३९८.६० |
| एकूण | | २,०५,६९४.७३ |

## परिशिष्ट-४

### खर्चासाठी केलेल्या तरतूदी

| तपशील | १९८४–८५ रु. पैसे |
|---|---|
| खर्चापोटी देणी | ७१,५८,९९८.०१ |
| सेवक बोनस | ८८,६८,४२७.०० |
| लेखा परिक्षण शुल्क | ४०,००,०००.०० |
| एकूण | २,००,२७,४२५.०१ |

## परिशिष्ट-५

### इतर देणी

| तपशील | १९८४–८५<br>रु. पैसे |
|---|---|
| दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. | १,४८,९३,२५९.४२ |
| इतर देणी | १५,०७,१६०.७५ |
| एकूण | १,६४,००,४२०.१७ |

## परिशिष्ट-६

### निव्वळ नफा

| तपशील | १९८४–८५<br>रु. पैसे |
|---|---|
| निव्वळ नफा १९८४–८५ | १,१४,८५,८६०.६० |
| एकूण | १,१४,८५,८६०.६० |

## परिशिष्ट-७

### हातातील व बँकेतील शिल्लक

| तपशील | १९८४–८५<br>रु. पैसे |
|---|---|
| हातातील शिल्लक | ११,८७८.३० |
| बँकेतील शिल्लक | २९,४७,९७७.४९ |
| एकूण | २९,५९,८५५.७९ |

## परिशिष्ट-८

### कर्ज दिलेल्या ठेवी व आगाऊ दिलेली रक्कम

| तपशील | रु. पैसे | १९८४-८५ रु. पैसे |
|---|---|---|
| **कर्ज** | | |
| वाहन कर्ज | २३,१९१.२१ | |
| स्टाफ बेनेफिट फंड कर्ज | ३,३२०.०० | २६,५११.२१ |
| **ठेवी** | | |
| तार | १४,३००.०० | |
| दूरध्वनी | ३,३४,१५४.२७ | |
| पोस्ट बॉक्स | १७.०० | |
| टेलेक्स | ५३,०७३.०० | |
| गौतम इमारत (भाड्यापोटी) | २०,६८,०००.०० | |
| ऑक्ट्रॉय | ३००.०० | |
| पेट्रोल व ऑईल | ५,२२७.०० | |
| इलेक्ट्रीसिटी | २,०१०.०० | |
| न्यूज पेपर्स | ९०.०० | |
| गौतम इमारत सुरक्षित ठेव | ७,००,०००.०० | |
| इतर ठेवी | ८२,०१५.९५ | ३२,५९,१८७.२२ |
| **आगावू दिलेली रक्कम** | | |
| सेवक ॲडव्हान्स (प्रवास खर्चासाठी) | ३,३८,५९६.०५ | |
| सेवक ॲडव्हान्स (सण व उत्सव) | ४,५६,१००.०० | |
| सेवक ॲडव्हान्स (कार्यालयीन खर्चासाठी) | २०,८२७.५२ | |
| बिल्डिंग ॲडव्हान्स | ३१,९०,०००.०० | |
| इतर ॲडव्हान्स | ३,४३,७५५.६९ | ४३,४९,२७९.२६ |
| **एकूण** | | ७६,३४,९७७.६९ |

## परिशिष्ट-९

### मिळावयाचे मुख्य अभिकर्ता कमिशन

| तपशील | | १९८४–८५ रु. पैसे |
|---|---|---|
| मुख्य अभिकर्ता कमिशन (एकूण खरेदी किंमतीच्या २%) | | ९,८४,७८,४८०.०० |
| १९८४–८५ एकूण कापूस खरेदी (क्विंटल) | ८६,५२,९२४ | |
| १९८४–८५ एकूण कापूस खरेदी किंमत (रुपये) | ४,९२,३९,२४,०४३.८४ | |
| एकूण | | ९,८४,७८,४८०.०० |

## परिशिष्ट-१०

### कायम जिंदगी

| अ.नं. | तपशील | वर्षातील खरेदी व मार्केटिंग फेडरेशन–कडून वर्ग | वर्षातील विक्री | एकूण | घसारा | ३०–९–१९८५ अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ३–४=५ | ६ | ५–६=७ |
| १ | फर्निचर व फिक्चर | २७,४६,५३८.६५ | — | २७,४६,५३८.६५ | २,५८,६४९.१३ | २४,८७,८८९.५२ |
| २ | ऑफिस इक्विपमेंट | ११,१७,७७६ .९० | १,८१८.२४ | ११,१५,९५८.६६ | १,४९,२३०.३१ | ९,६६,७२८.३५ |
| ३ | डेड स्टॉक | १५,६२८.१३ | — | १५,६२८.१३ | १,५४५.३२ | १४,०८२.८१ |
| ४ | वाहने | १३,६२,६६४.३५ | — | १३,६२,६६४.३५ | २,५२,१८७.७८ | ११,१०,४७६.५७ |
| ५ | इलेक्ट्रीक इन्स्टॉलेशन | १,५५,३८२.६३ | — | १,५५,३८२.६३ | ७,७६९.१३ | १,४७,६१३.५० |
| ६ | लायब्ररी | ५,०६५.७० | — | ५,०६५.७० | — | ५,०६५.७० |
| | एकूण | ५४,०३,०५६.३६ | १,८१८.२४ | ५४,०१,२३८.१२ | ६,६९,३८१.६७ | ४७,३१,८५६.४५ |

## कॉटन ग्रोअर्स फेडरेशनच्या पोटनियम १०, मध्ये सुचविण्यात आलेल्या बदलाचा तक्ता

| पोटनियम नंबर | प्रचलित पोटनियम | सुचविण्यात आलेला पोटनियम | बदलाचे कारण |
|---|---|---|---|
| १० | नाममात्र सभासदत्व रु. १० प्रवेश फी भरून कोणत्याही व्यक्ती, कंपनी किंवा इतर कायद्याखाली रजिस्टर झालेल्या संस्था आणि महाराष्ट्र राज्याबाहेरील कोणतीही सहकारी संस्था यांना खुले राहील.<br>नाममात्र सभासदांना फेडरेशनच्या कामकाजात भाग घेण्याचा आणि सर्व साधारण सभेत मतदान करण्याचा हक्क राहणार नाही. | नाममात्र सभासदत्व रु. १०/- प्रवेश फी भरुन कोणत्याही व्यक्ती कंपनी किंवा इतर कायद्याखाली रजिस्टर झालेली संस्था आणि इतर कोणतीही सहकारी संस्था यांना खुले राहील. नाममात्र सभासदांना फेडरेशनच्या कामकाजात भाग घेण्याचा आणि सर्व साधारण सभेत मतदान करण्याचा हक्क राहणार नाही. | या पोटनियमाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्था, नॉमिनल सभासद होऊ शकत नाहीत. राज्यातील सहकारी संस्थाना नाममात्र सभासद करुन घेण्यास ही दुरुस्ती आवश्यक आहे. |
| ५१ | कार्यकारी समिती खालील प्रमाणे राहील.<br>१) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>२) उपाध्यक्ष<br>३) फेडरेशनचे कार्यकारी संचालक<br>४) संचालक मंडळाने नियुक्त करावयाचे दोन संचालक<br>५) शासनाचे प्रतिनिधित्व करणारे संचालक<br>६) निबंधक सहकारी संस्था किंवा त्यांचा प्रतिनिधी. | १) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>२) उपाध्यक्ष<br>३) फेडरेशनचे कार्यकारी संचालक<br>४) संचालक मंडळाने नियुक्त करावयाचे ६ (सहा) संचालक<br>५) शासनाचे प्रतिनिधित्व करणारे संचालक<br>६) निबंधक सहकारी संस्था किंवा त्यांचा प्रतिनिधी. | संचालक मंडळातील सर्व संचालकांना उपसमित्यांवर योग्य प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी दुरुस्ती आवश्यक आहे. |
| ५३ | सेवक समिती खालील प्रमाणे राहील.<br>१) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>२) उपाध्यक्ष<br>३) संचालक मंडळाने नियुक्त करावयाचे दोन प्रतिनिधी.<br>४) शासनाचे प्रतिनिधीत्व करणारे संचालक<br>५) सहनिबंधक सहकारी संस्था किंवा त्यांचा प्रतिनिधी<br>६) फेडरेशनचे कार्यकारी संचालक | १) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>२) उपाध्यक्ष<br>३) संचालक मंडळाने नियुक्त करावयाचे ६ संचालक<br>४) शासनाचे प्रतिनिधित्व करणारे संचालक<br>५) सहनिबंधक सहकारी संस्था किंवा त्यांचा प्रतिनिधी.<br>६) फेडरेशनचे कार्यकारी संचालक. | वरील प्रमाणे |

| पोटनियम नंबर | प्रचलित पोटनियम | सुचविण्यात आलेला पोटनियम | बदलाचे कारण |
|---|---|---|---|
| ५५ | खरेदीविक्री धोरण समिती खालीलप्रमाणे राहील.<br>१) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>२) संचालक मंडळाने नियुक्त केलेले दोन संचालक.<br>३) संचालक मंडळात शासनाचे प्रतिनिधीत्व करणारे संचालक.<br>४) फेडरेशनचे कार्यकारी संचालक | १) फेडरेशनचे अध्यक्ष या समितीचे अध्यक्ष राहतील<br>२) उपाध्यक्ष<br>३) संचालक मंडळाने नियुक्त करावयाचे ६ संचालक<br>४) संचालक मंडळात शासनाचे प्रतिनिधीत्व करणारे संचालक<br>५) फेडरेशनचे कार्यकारी संचालक | या समितीमध्ये उपाध्यक्षांचा देखील समावेश असणे आवश्यक आहे. |

## STATEMENT SHOWING THE PROPOSED CHANGES IN OUR BYE-LAWS NO. 10, 51, 53, 55.

| Bye-Law No. | Existing Bye-law | Proposed Bye-law | Reason for change |
|---|---|---|---|
| 10 | The nominal membership is open to any person company or any other Corporate body registered under any Act & any Cooperative society outside the Maharahstra State on payment of Rs. 10 as entrance fee.<br>The nominal member shall have no right to participate in the management of the Fedn. & he shall not have a right to vote in the General Meeting. | The nominal membership is open to any person, Company or any other Corporate body registered under any Act & any Coop. Society on payment of Rs. 10/- as entrance fee. The nominal member shall have no right to participate in the management of the Fedn. & he shall not have a right to vote in the General Meeting. | Under the present Provisions of this Bye-law Coop. Societies in the state of Maharashtra cannot become the nominal members. In order to provide nominal membership to such societies. This modification is necessary. |
| 51 | Executive Committee shall consist of the following :<br>1) The Chairman of the Fedn. who shall be the Chairman of the Committee.<br>2) Vice-Chairman of theFedn.<br>3) The Managing Director of the Fedn.<br>4) Two Directors to be nominated by the Board of Directors.<br>5) One Director representing the Govt. on the Board.<br>6) Registrar of Coop. Sty. or his representative. | 1) The Chairman of the Fedn. who shall be the Chairman of the Committee.<br>2) Vice-Chairman of the Federation.<br>3) The Managing Director of the Fedn.<br>4) Six Directors to be nominated by the Board of Directors.<br>5) One Director representing the Govt. on the Board.<br>6) Registrar of Coop. Societies or his representative. | In order to give proper representation to all members of the Board of Directors on the sub-commities this modification is necessary. |

| Bye-law No. | Existing Bye-law | Proposed Bye-law | Reason for change |
|---|---|---|---|
| 53 | The staff committee shall consist of the following.<br>1) The Chairman of the Fdn. who shall be the Chairman of the committee.<br>2) Vice-Chairman<br>3) Two Directors to be nominated by the Board.<br>4) Director representing Govt. on Board.<br>5) Registrar of Coop. Sty. or his representative.<br>6) Managing Director of the Federation. | 1) The Chairman of the Fedn. who shall be the Chairman of the Committee.<br>2) Vice-Chairman of the Federation.<br>3) Six Directors to be nominated by the Board of Directors.<br>4) One Director representing the Govt. on the Board.<br>5) Registrar of Coop. or his representative.<br>6) Managing Director of the Fedn. | As above |
| 55 | The Purchase and Sale Policy Committee shall consist of the following:<br>1) Chairman of the Fedn. who shall be the Chairman of the Committee.<br>2) Two Directors of the Fedn. nominated by the Board.<br>3) Director representing the Govt. on the Board.<br>4) Managing Director of the Federation. | 1) The Chairman of the Fedn. who shall be the Chairman of the Committee.<br>2) Vice-Chairman of the fedn.<br>3) Six Directors to be nominated by the Board of the Directors.<br>4) One Director representing the Govt. on the Board.<br>5) Managing Director of the Fedn. | Inclusion of Vice Chairman in this committee is also necessary. |

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कॉटन ग्रोअर्स मार्केटिंग फेडरेशन लि.
गौतम बिल्डींग, झकेरिया बंदर रोड, शिवडी, मुंबई ४०० ०१५.
विक्री कार्यालयः खेतान भवन, ६ वा माळा, जमशेटजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.